दैनिक
# चकमक
संपादक : शामसुंदर चितोडा
कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




वर्ष : ०१ ले ✻ अंक : १९ ✻ जालना ✻ ✻ गुरूवार २० ऑगस्ट २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻

## टँकरद्वारे पाणीपुरवठा झालेल्या गावांचा, जलयुक्त शिवार ३.० मध्ये प्राधान्य मिळणार : फडणवीस



मुंबई : महाराष्ट्रातील मागील पाच वर्षांत टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागलेल्या पाणी टंचाईग्रस्त गावांचा जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्याने समावेश करून, या गावांमध्ये जलसंधारणाची कामे तातडीने हाती घ्यावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मृद व जलसंधारण व्यवस्थापनाबाबत बैठक झाली. यावेळी राज्यातील जलसंधारणाची कामे, जलस्रोतांचे बळकटीकरण तसेच विविध विभागांच्या समन्वयातून जलव्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील सूक्ष्म पाणलोट क्षेत्रांचा विकास आणि जलस्रोतांचे बळकटीकरण याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. ज्या प्रकल्पांची कामे निश्चित करण्यात आली आहेत, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. या कामांना प्राधान्याने गती देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने नियोजन (पान ३ वर) करावे. त्यामुळे

## आ. अर्जुनराव खोतकर यांच्या पाठपुराव्याला यश

### जालना महानगरपालिकेत आकृती बंधानुसार ९९३ जागा भरतीला प्रत्यक्षात मान्यता

जालना: जालना शहर महानगरपालिकेतील विविध विभागांमधील ९९३ जागा प्रत्यक्ष भरण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश प्राप्त झाले असून यामुळे पालिकेचा कारभार सुरळीत होणार आहे. यामुळे नागरिकांची विविध विकास कामे मार्गी लागण्यास मोठी मदत होणार आहे. जालना शहराची लोकसंख्या सुमारे साडेतीन लाखावर पोचली आहे. त्यामुळे जालना नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर व्हावे यासाठी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी नगरविकास मंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे आग्रह धरला होता. त्यामुळे २२ ऑगस्ट २०२३ रोजीच जालना शहर महानगरपालिका अस्तित्वात आली. महानगरपालिका अस्तित्वात येण्याआधी आणि नंतरही आमदार खोतकर यांच्या विरोधकांनी



महानगरपालिकेस विरोध केला होता. नागरिकांना जास्तीचा टॅक्स द्यावा लागेल, मनपा कर्मचाऱ्यांचे पगार देखील होणार नाहीत, विकासकामाला खिळ बसेल अशा प्रकारची टीकाटिप्पणी त्यांच्या विरोधकांनी केली होती. परंतु प्रत्यक्षात जालना शहर महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर शहराला मिळणाऱ्या विकासनिधीत वाढ झाली. महापालिकेला आयएएस दर्जाचे आयुक्त मिळाले. तसेच विविध विभागांसाठी ९९३ कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधास १९ सप्टेंबर २०२५ रोजीच मान्यता मिळाली होती. मात्र प्रत्यक्षात त्या त्या पदांची भरती व्हावी यासाठी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, सुनेत्रा पवार यांच्याकडे सातत्याने आग्रह धरला आणि पाठपुरावा केला. त्यामुळे आता थेट पदभरतीसही मान्यता मिळाली आहे. १९ ऑगस्ट रोजी तसा शासन निर्णय सहसचिव विद्या रामप्पा हंप्पया यांनी निर्गमित केला असून ( जालना शहर महानगरपालिका (पान ३ वर)

## वाटूर फाटा ते जालना रस्त्यावरील दोन्ही बाजूचे खड्डे बुजवत नाही तोपर्यंत टोल नाका बंद करा : मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके






जालना/प्रतिनिधी : जालना जिल्ह्यातील वाटूर फाटा ते जालना या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोठमोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अपघाताचा धोकाही निर्माण झाला आहे. दररोज या मार्गावरून मोठ्या प्रमाणात जड वाहतूक आणि इतर वाहने ये-जा करीत असताना रस्त्याची योग्य प्रकारे दुरुस्ती होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांच्याकडे ई-मेलद्वारे तक्रार केली आहे. वाटूर फाटा ते जालना रस्त्यावरील दोन्ही बाजूचे सर्व खड्डे तातडीने बुजवून रस्ता सुरक्षित आणि वाहतुकीस योग्य करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे असताना वाहनधारकांकडून टोल वसुली सुरू आहे. नागरिकांकडून टोल वसूल केला जात असेल तर त्यांना सुरक्षित आणि चांगल्या दर्जाचा रस्ता मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे रस्त्यावरील दोन्ही बाजूचे खड्डे पूर्णपणे बुजवून रस्त्याची दुरुस्ती होत नाही, तोपर्यंत टोल नाका बंद करण्यात यावा, अशी स्पष्ट मागणी प्रकाश सोळंके यांनी केली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करून रस्त्याची सद्यस्थिती तपासावी आणि तातडीने दुरुस्तीचे काम सुरू करावे. रस्त्याच्या देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी असताना संबंधित यंत्रणेकडून योग्य कार्यवाही का झाली नाही, याचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

वाटूर फाटा ते जालना मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असल्याने रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनांचे नुकसान होण्याबरोबरच प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून कोणतीही दुर्घटना घडण्याची वाट न पाहता तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली आहे. रस्त्यावरील (पान ३ वर)

## वैध कत्तलखाना व मांस विक्री करणाऱ्यांवर महापालिकेची कडक कारवाई शेड उध्वस्त व पाच हजाराचा दंड

जालना शहरातील चामडा बाजार, दर्गा गल्ली, मंगल बाजार परिसरात अवैध कत्तलखाना व मांस विक्री करणाऱ्या विक्रेत्यावर आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी महापालिकेच्या पथकाकडून कठोर कारवाई करण्यात आली. या कारवाईत संबंधित विक्रेत्याचे अनधिकृत शेड उध्वस्त करण्यात आले असून त्यांच्यावर ५०००/- दंडात्मक कारवाई देखील करण्यात आली आहे.

ही कारवाई ✻माननीय आयुक्त अंजली शर्मा✻ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी उपायुक्त श्री त्रिंबक कांबळे, सहायक आयुक्त विजय फुलंब्रीकर, स्वच्छता प्रमुख श्री सुधीर डहाळे, चिकन-मटन विभाग



प्रमुख मोहम्मद अमजद खान, वाहन शाखा सहाय्यक शुभम जाधव, प्रभारी स्वच्छता निरीक्षक राधेश्याम लोखंडे तसेच विक्रांत कीर, राहुल लोखंडे, अशोक गायकवाड, मेथ्यू चाको, राहुल हिवाळे व इतर कर्मचारी उपस्थित होते.
नागरिकांना आवाहन: शहरात अवैध कत्तलखाना व मांस विक्री पूर्णपणे बेकायदेशीर आहे. असे आढळून आल्यास संबंधितावर भविष्यातही अशीच कठोर कारवाई सुरू राहील. तरी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे. महापालिका प्रशासन, जालना

जालना महानगरपालिकेच्या 'सेवा प्रवेश नियमावली' स राज्य शासनाची (पान ३ वर)

## जालन्यात ९ वे आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलन व पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

### देश-विदेशातील पत्रकारांची उपस्थिती, विविध क्षेत्रातील २४ मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव

जालना (प्रतिनिधी) : जालना शहरात पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांचा मेळावा पाहायला मिळाला. इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनच्या वतीने ९ वे आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलन आणि पुरस्कार सोहळा २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.
या आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलनासाठी भारतातील विविध राज्यांमधून पत्रकार उपस्थित होते. विशेष म्हणजे शेजारील नेपाळ देशातील पत्रकारांनीही या संमेलनाला उपस्थिती लावली. त्यामुळे जालन्यातील या पत्रकार संमेलनाला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.
या कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सेराज अहमद कुरैशी तसेच प्राध्यापक विजय कमळे पाटील उपस्थित होते.
तर दिल्ली येथील राजकीय विश्लेषक अशोक वानखेडे आणि धाकड न्यूजचे मुख्य संपादक अक्रम रईस खान यांनी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित पत्रकारांना संबोधित केले.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार कैलास गोरंट्याल होते.
यावेळी मान्यवरांनी पत्रकारितेच्या बदलत्या स्वरूपावर सविस्तर भाष्य केले. डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव, पत्रकारांसमोरील बदलती आव्हाने, बातमीची विश्वासार्हता, पत्रकारितेतील मूल्ये आणि समाजाप्रती असलेली पत्रकारांची






जबाबदारी या विविध विषयांवर उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. पत्रकार हा केवळ बातमी पोहोचविण्याचे काम करणारा घटक नसून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे आणि लोकशाही अधिक सक्षम करण्याचे महत्त्वपूर्ण काम पत्रकारितेच्या माध्यमातून केले जाते, यावरही यावेळी भर देण्यात आला. या कार्यक्रमाला जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनीही उपस्थिती लावली. त्यांनी पत्रकार संमेलन आणि पुरस्कार सोहळ्याला शुभेच्छा देत पत्रकारांच्या कार्याचे कौतुक केले.
यावेळी काँग्रेसचे जालना जिल्हाध्यक्ष कल्याण दळे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे, सामाजिक कार्यकर्ते साद बीन मुबारक, रतन लांडगे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.
दरम्यान, पत्रकारिता क्षेत्रासह विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २४ मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना मान्यवरांनी आयोजकांचे आभार व्यक्त केले.
देशातील विविध भागांतून आलेले पत्रकार, मान्यवर वक्ते आणि सामाजिक व राजकीय क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींच्या उपस्थितीमुळे या संमेलनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. पत्रकारांच्या प्रश्नांवर चर्चा, पत्रकारितेतील बदलत्या प्रवाहावर विचारमंथन आणि उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान अशा विविध उपक्रमांनी जालन्यातील ९ वे आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलन आणि पुरस्कार सोहळा २०२६ उत्साहात संपन्न झाला.
एकूणच, पत्रकारितेची विश्वासार्हता, सामाजिक बांधिलकी आणि लोकशाहीतील माध्यमांची भूमिका यावर विचारमंथन घडवून आणणारे हे संमेलन ठरले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, इंडियन जर्नालिस्ट असोसिएशन जालनाचे जिल्हाध्यक्ष आमेर खान, व इंडियन जर्नालिस्ट असोसिएशन जालना चे जिल्हा उपाध्यक्ष सुनील भारती, व सर्व इंडियन जर्नालिस्ट असोशियन जालना जिल्हा टीम ने या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अधिक परिश्रम घेतले.

## जालना महापालिकेच्या सेवा प्रवेश व सेवा वर्गीकरण नियमांना शासनाची मंजुरी

### ९९३ पदांच्या आकृतिबंधानुसार नियुक्ती व सेवांचे नियमन होणार

जालना/प्रतिनिधी : जालना शहर महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती तसेच सेवांचे नियमन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'जालना शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२६' या नियमांना राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. नगर विकास विभागाने बुधवार, १९ ऑगस्ट २०२६ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे.
९९३ पदांचा आकृतिबंध मंजूर महानगरपालिका नव्याने स्थापन झाल्यानंतर शासनाने ११ सप्टेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकूण ९९३ पदांचा आकृतिबंध मंजूर केला आहे. राज्यातील महानगरपालिकांचे वर्गीकरण आणि त्यानुसार महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या पदांसाठी निश्चित करण्यात आलेल्या आकृतिबंधाच्या आधारे जालना महानगरपालिकेच्या सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण नियम, २०२६ तयार करण्यात आले.
जालना शहर महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ४५७ (३) अन्वये शासन मान्यतेसाठी सादर केलेल्या नियमांना शासनाने मंजुरी दिली आहे. त्याचबरोबर महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५४, ४५५, ४५६, ४५७ (३) व ४६५ अन्वये या नियमांना मान्यता देण्यात आली आहे. शासन निर्णयात परिशिष्ट १ ते ४ सह 'जालना शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२६' यांना मान्यता देण्यात आल्याचे शासन निर्णयात नमुद करण्यात आले आहे.

## दलित महासंघाच्या जालना जिल्हाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते विजय दिगंबरराव जाधव

जालना । प्रतिनिधी : दलित महासंघाच्या जालना जिल्हाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते विजय दिगंबरराव जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दलित महासंघाचे संस्थापक-अध्यक्ष प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी नियुक्तीपत्र देऊन ही नियुक्ती जाहीर केली. नियुक्तीपत्रानुसार, विजय जाधव यांनी आजपर्यंत केलेल्या सामाजिक कार्याची



दखल घेऊन त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. दलित, वंचित, पीडित व अन्यायग्रस्त समाजघटकांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटनेच्या विचारांनुसार कार्य करावे, अशी अपेक्षा संस्थापक-अध्यक्षांनी व्यक्त केली आहे.
दलित महासंघ ही महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांनी प्रेरित सामाजिक संघटना असून, समाजातील दुर्बल घटकांच्या हक्कांसाठी कार्यरत आहे.
यावेळी विजय जाधव यांच्या पुढील सामाजिक व संघटनात्मक वाटचालीसाठी प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे यांनी शुभेच्छा देत त्यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन केले.

## जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समिती बैठकीचे आयोजन

जालना : जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीची बैठक गुरुवार दि. २० ऑगस्ट,२०२६ रोजी सायं. ५.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. असे जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

## सोनाली वैद्य यांना ग्रंथालय व माहिती शास्त्र पदवी प्रदान

जालना : विद्याचल शिक्षण संस्था, जालना येथून सौ. सोनाली सुयोग वैद्य (कुलकर्णी) यांना ग्रंथालय व माहितीशास्त्रातील पदव्युत्तर पदवी प्रदान करण्यात आली. ही उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी केल्याबद्दल श्री नृसिंह बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी सुहास वैद्य, लता वैद्य, नारायण वैद्य, सुयोग वैद्य, अश्विनी वैद्य, अमोल टाकळकर, मुकुल देशपांडे तसेच दर्पण जैन उपस्थित होते. सोनाली वैद्य यांनी मिळविलेल्या या शैक्षणिक यशाबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या



यशामुळे कुटुंबीयांसह संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आनंद व्यक्त केला.
ग्रंथालय व माहितीशास्त्र क्षेत्रातील उच्च शिक्षण पूर्ण करून सोनाली वैद्य यांनी शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. त्यांच्या या यशाबद्दल नातेवाईक, मित्रपरिवार आणि हितचिंतकांकडूनही अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# संपादकीय

## अराजकाशी दोन हात

भारतात सरकारकडे एवढी प्रचंड शासनक्षमता आहे, की तिचा पूर्ण वापर करण्याची वेळ क्वचितच येते. इथलं सामाजिक, राजकीय वातावरणही विवेकी, परिपक्व आहे. लोकशाही शासन व्यवस्था इथे अंगवळणी पडली आहे. इस्लामी देशांसारखा सत्तेच्या पाशवी बळाचा वापर करावा लागत नाही. केंद्र सरकारला घटनादत्त अधिकारांचं मोठं वरदान आहेच; त्यात सरकार नुसतं स्थिर नाही, चांगलं भरभक्कम आहे. देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रभावाखालीच आहे ज्यापक्षाची नोंदणी नाही, पदाधिकारी-कार्यकारिणी नाही, देशात कुठे कार्यालय नाही- असा पक्ष दिल्लीत 'जंतरमंतर'सारख्या ठिकाणी ३७ दिवस सलग आंदोलन करतो; कुठलाही परिचित चेहरा नेता म्हणून नसताना देशभरातून विद्यार्थ्यांचे लोंढेच्या लोंढे दिल्लीला धडकू लागतात, देशातल्या असंख्य शहरांमध्ये विद्यार्थी कोणत्याही प्रस्थापित राजकीय पक्षाच्या पाठिंबा किंवा पुढाकाराशिवाय रोज रस्त्यावर येऊ लागतात, तेव्हा त्या वातावरणाची दखल कोणत्याही, कितीही शक्तिशाली सरकारला घ्यावीच लागते. केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार जनमताविषयी विशेष संवेदनशील असल्याने त्यांना या असंतोषाचा अर्थ, त्यातली ताकद नेमकी समजली. त्यांनी आंदोलकांच्या तिन्ही मागण्या मान्य केल्या. आंदोलन संपलं. विद्यार्थी घरोघरी गेले. हातून निसटून चाललेल्या वातावरणावर केंद्र सरकारने शेवटच्या दोन दिवसांत चांगली पकड मिळवली. हे वातावरण आणखी काही काळ असंच ठेवण्यात सरकारचं हित होतं. आपली 'शासन' म्हणून असलेली ताकद कधी वापरायची आणि 'सत्ताधारी म्हणून न्याय करणारे आम्हीच आहोत' याची केवळ जाणीव देऊन बहुतांश प्रश्न कसे आपल्या सोयीने सोडवायचे, हे कोणत्याही सत्ताधाऱ्यांचं खरं कौशल्य असतं. लोकशाहीत 'सरकार' ही कधीच एक व्यक्ती नसते. सरकारच्या धोरण-नीतीत अनेकांचे आडाखे-विचार-मनसुबे दडलेले असतात. राजकीय प्रश्न हाताळताना यात जेवढी एकवाक्यता असेल, तेवढं त्या सरकारचं यश वाढत असतं. आंदोलन संपवण्यासाठी शेवटच्या दोन दिवसांत शिताफीने ज्या हालचाली झाल्या, त्यावरून या सरकारचं मुत्सद्दीपण अधोरेखित झालं होतं. पण, राजीनामा द्यावा लागलेल्या धर्मेंद्र प्रधान(ज्हरीशपवीर झीरवहरप)यांचं संसदेच्या आवारात दुसऱ्याच दिवशी जे स्वागत झालं, त्यातून या यशाला गालबोट लागायला सुरुवात झाली, असं दिसतं. विद्यार्थी आंदोलकांवर बिहारमध्ये एके-४७ मधून गोळीबार झाल्याने त्यात आणखी भर पडली. सावरलेली सरकारची प्रतिमा या प्रकरणात पुन्हा घसरण्याची, आंदोलकांच्या सरशीची शक्यता माध्यमांना दिसू लागली. तशा वृत्तांकनाला सुरुवात होत असतानाच संबंधित पोलिस अधिकाऱ्याच्या निलंबनाची घोषणा झाली. आंदोलन मागे घेताना 'आंदोलक विद्यार्थ्यांवर कोणतेही खटले दाखल होणार नाहीत' असं आश्वासन विद्यार्थी नेत्यांनी मिळवलं होतं. पण, घाईघाईने त्यालाही हरताळ फासला जातो आहे, अशा बातम्या दिल्लीसह विविध राज्यांतून येऊ लागल्याने सरकारच्या विश्वासार्हतेचा प्रश्न उपस्थित होऊ लागला होता. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी(उश्रींशपवीर ऋरवपर्रीळी) अत्यंत सावधपणे, राजकीय परिपक्वता दाखवत महाराष्ट्रापुरता हा विषय निकाली काढला. बिहार आणि आसाम सरकारांनीही मग तसा निर्णय घेतला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचीही त्याला जोड मिळाली. आणखी एक दरड ढासळण्यापासून रोखली गेली! भारतात सरकारकडे एवढी प्रचंड शासनक्षमता आहे, की तिचा पूर्ण वापर करण्याची वेळ क्वचितच येते. इथलं सामाजिक, राजकीय वातावरणही विवेकी, परिपक्व आहे. लोकशाही शासन व्यवस्था इथे अंगवळणी पडली आहे. इस्लामी देशांसारखा सत्तेच्या पाशवी बळाचा वापर करावा लागत नाही. केंद्र सरकारला घटनादत्त अधिकारांचं मोठं वरदान आहेच; त्यात सरकार नुसतं स्थिर नाही, चांगलं भरभक्कम आहे. देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रभावाखालीच आहे. अशा परिस्थितीत सत्तेचा 'शासन' म्हणून किंचितही अधिक वापर सरकारच्या प्रतिमेवर विपरीत परिणाम करणारा ठरू शकतो. प्रधान यांचं संसदेच्या आवारातलं स्वागत, बिहारमधला एके-४७ चा वापर किंवा दिल्लीतला 'पॅलेट गन'चा वापर- या तिन्ही घटनांची स्पष्टीकरणं द्यायची वेळ आता सरकारवर आली आहे. संयमाला लवकर सोडचिठ्ठी दिल्याचा हा परिणाम आहे. परिस्थिती हाताळताना पंतप्रधान मोदी कोणत्या नीतीचा अवलंब करताहेत हे जराही लक्षात न घेता झालेल्या या घटनांमुळे सरकारवर आरोपांच्या फैरी सुरू आहेत. फडणवीस यांच्यासारखी भूमिका सर्व पातळ्यांवर घेतली गेली असती, काही काळ जाऊ दिला असता, तर सरकारला आज विरोधकांवर उलट हल्ला करता आला असता. तसे असंख्य मुद्दे असूनही संसदेतली चर्चा वरील मुद्द्यांभोवतीच केंद्रीत झाली आहे. तेच मुद्दे देशभर जात आहेत. आंदोलन मिटवताना चार पावलं पुढे गेलेल्या सरकारला दोन पावलं मागे यावं लागतं आहे. विद्यार्थ्यांना पुन्हा चिथवण्यासाठी वेगवेगळे मुद्दे पुढे आणण्याचा प्रयत्न देशात अनेकांकडून होतो आहे. त्यांना या वातावरणातून ताकद मिळू शकते. राजकारणात मिळवलेल्या यशाचं 'पूर्ण यशा'त रूपांतर होईपर्यंत थांबणं केव्हांही श्रेयस्कर असतं. पुढची खेळी खेळण्याची संधी प्रत्येकालाच असते! भारतीय जनता पक्ष खरंतर ओळखला जातो त्याच्या मजबूत संघटनेमुळे. या पक्षाच्या परिवारात अनेक अनेक संस्था, संघटना आहेत आणि या प्रत्येकाची संघटनात्मक रचना, बांधणी, यंत्रणा मजबूत आहे. भाजपच्या या वैशिष्ट्यांची तुलना होऊ शकेल, असा दुसरा पक्ष देशात नाही. त्यामुळे, भाजपला आव्हान देणं कोणासाठीही अशक्य आहे, असं वाटत असतानाच देशाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या तोंडून सहज निसटलेल्या एका उद्गारातून एक आंदोलन उभं राहतं आणि जे गेल्या बारा वर्षात घडलं नाही, अशी माघार सरकारला घ्यावी लागते, हे देशात सर्वांसाठीच विचार करण्यासारखं आहे. 'सरकारचा किंवा भाजपचा पराभव' यासारख्या उथळ आणि वरकरणी विश्लेषणाचा हा मुद्दा नाही. ज्या वयोगटातून हे आंदोलन उभं राहिलं, फैलावलं, त्यातून व्यवस्थेविषयी जी चीड निर्माण झाली, त्याचा धोरणकर्ते आणि समाजचिंतकांनी खोलात जाऊन विचार करण्याची गरज आहे. ही गरज ज्यांच्या लक्षात येईल, त्यांनाच येणाऱ्या काळाचा अंदाज घेता येईल. राष्ट्रीय लोकशाही आघाडीतल्या पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनीही सरकारच्या प्रयत्नात अडथळे येईल, असं वागणं टाळलं, तर बरं. अन्यथा, आज नसलेली 'कॉक्रोच पार्टी' उद्या खरोखरच उभी राहील.

# जलसंधारणातून घडवूया बारमाही हिरवा महाराष्ट्र

पाऊस पडतो तेव्हा आपण आनंदतो; पण तोच पाऊस वाहून जातो तेव्हा त्याच्याकडे दुर्लक्ष करतो. आकाशातून पडणारा प्रत्येक थेंब जमिनीवर थांबविणे, तो जमिनीत मुरविणे, भूजलपातळी वाढविणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे, हीच आजच्या महाराष्ट्राची सर्वात मोठी गरज आहे. म्हणूनच यंदा २१ ऑगस्ट रोजी साजरा होणारा जलसंधारण दिन हा केवळ शासकीय कार्यक्रम न राहता लोकसहभागाची नवी सुरुवात ठरली पाहिजे.

शासनाने माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जन्मदिनी, म्हणजेच २१ ऑगस्टला दरवर्षी 'जलसंधारण दिन' साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामागे जलसंधारण क्षेत्रातील सुधाकरराव नाईक यांच्या योगदानाचे स्मरण आणि जलसंधारणाची लोकचळवळ अधिक व्यापक करण्याचा उद्देश आहे. या दिवशी जलपूजन, विविध जलसंधारण कामांचे भूमिपूजन व लोकार्पण, श्रमदान, जनजागृती, उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव आदी उपक्रम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याच पार्श्वभूमीवर राज्यात जलसंधारण दिनाच्या निमित्ताने आठवडाभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमात शासकीय कार्यालयांमध्ये मृद व जलसंधारणाची शपथ घेऊन या लोकचळवळीची सुरुवात करण्यात आली. २१ ऑगस्ट रोजी 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर', रील्स स्पर्धा, जलपूजन, श्रमदान आणि जनजागृतीचे उपक्रम नागरिकांना सहभागी करून घेण्यासाठी आयोजित केले जात आहेत.

**जलसंधारण म्हणजे काय**

पावसाचे पाणी शक्य तितक्या मोठ्या प्रमाणात जमिनीवर अडविणे, त्याचा वेग कमी करणे, जमिनीत मुरविणे, भूजलाचे पुनर्भरण करणे, जलस्रोतांची साठवण क्षमता वाढविणे आणि उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे, याला व्यापक अर्थाने जलसंधारण म्हणता येईल. जलसंधारण म्हणजे केवळ बंधारा बांधणे नव्हे. पाण्याचा प्रत्येक थेंब जिथे पडतो, तिथेच त्याचा अधिकाधिक उपयोग करणे, ही त्यामागची मूलभूत संकल्पना आहे.

महाराष्ट्रासाठी ही बाब अधिक महत्त्वाची आहे. राज्याच्या भौगोलिक क्षेत्रापैकी सुमारे ५२ टक्के क्षेत्र अवर्षणप्रवण आहे. पावसाचे भौगोलिक आणि कालिक वितरण असमान आहे. काही भागात अतिवृष्टी होते, तर काही भागात पावसाची प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे 'पाणी आहे, पण योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी नाही' हीच मोठी समस्या आहे. जलसंधारणातून या विसंगतीवर मात करता येते.

महाराष्ट्राच्या जलसंधारणाची मुळे महाराष्ट्रात जलसंधारणाची परंपरा नवी नाही. गावागावातील तलाव, बंधारे, पाझर तलाव, विहिरी आणि पारंपरिक जलव्यवस्थापन ही ग्रामीण जीवनाची पूर्वापार साधने आहेत. ही परंपरा थेट छत्रपती शिवरायांचा काळापर्यंत जाते. गड किल्ल्यावर पावसाचे पाणी साठवण्याची मोठी परंपरा आहे. यावर महाराष्ट्राने शिवकालीन पाणी साठवण योजनाही सुरु केली आहे. आधुनिक शासकीय पातळीवर मात्र जलसंधारणाला स्वतंत्र संस्थात्मक दिशा मिळाली ती स्वतंत्र जलसंधारण विभागाच्या स्थापनेमुळे.महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनीही १९७२ च्या दुष्काळानंतर जलसंधारण माध्यमातून 'जलक्रांन्ती' घडवून आणली होती. त्यांनी पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबवून पाणलोट क्षेत्र वाढवले मोठ्या धरणांपेक्षा बॅरेजेसला महत्व दिले

**जलयुक्त शिवारातून नव्या पर्वाला सुरुवात**

जलसंधारणाला मोठ्या प्रमाणावर लोकचळवळीचे स्वरूप देण्याच्या दृष्टीने २०१४ नंतरचा काळ महत्त्वाचा ठरतो.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात ५ डिसेंबर २०१४ च्या शासन निर्णयानुसार जलयुक्त शिवार अभियान सुरू करण्यात आले. या योजनेतून पुढे हजारो हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली. लक्षावधी टीएमसी पाणी साठा निर्माण झाला. हजारो **गावे पाणीदार झाली. त्यांचा शाश्वत विकास झाला.**

आज जलयुक्त शिवार २.0च्या माध्यमातूनही जलसंधारण, जलसाक्षरता, लोकसहभाग आणि उपलब्ध भूजलाच्या शाश्वत वापरावर भर दिला जात आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनीही स्पष्टपणे सांगितले आहे की, महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंधारणातून परिवर्तन घडविणे आवश्यक आहे.

योजनांची ताकद, लोकसहभागाची साथ

महाराष्ट्राने जलसंधारणासाठी अनेक मार्ग स्वीकारले आहेत. 'मागेल त्याला शेततळे' योजनेला २०१६ मध्ये सुरुवात करून शेतकऱ्यांना स्वतःची संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्याची संधी देण्यात आली.

'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही संकल्पना तर जलसंधारण आणि शेती यांची सांगड घालणारी आहे. धरणातील गाळ काढल्यामुळे जलाशयाची साठवण क्षमता वाढते आणि तोच गाळ शेतात टाकल्यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते. २०२४ मध्ये ही योजना कायमस्वरूपी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय विहीर पुनर्भरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, नाला खोलीकरण व रुंदीकरण, सिमेंट बंधारे, गॅबियन बंधारे, वनराई बंधारे, सलग समतल चर, शेततळी, जलस्रोतांमधील गाळ काढणे, बांधावर वृक्ष व बांबू लागवड अशा असंख्य उपाययोजना राज्यात राबविल्या जात आहेत.

**देशातील प्रेरणादायी उपक्रम**

राजस्थानच्या अलवरमध्ये पारंपरिक 'जोहड' या पावसाच्या पाण्याच्या साठवण संरचनांचे पुनरुज्जीवन करून गावकऱ्यांनी जलव्यवस्थापनाचे प्रभावी मॉडेल उभे केले. जलतज्ज्ञ आणि 'वॉटर मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे राजेंद्र सिंह यांच्या नेतृत्वाखालील लोकसहभागातून कोरड्या प्रदेशात जलस्रोत पुनरुज्जीवित झाले आणि अरवरीसारख्या नद्यांना पुन्हा प्रवाह मिळाला.

महाराष्ट्रात राळेगणसिद्धी आणि हिवरे बाजार ही दोन उदाहरणे तितकीच प्रेरणादायी आहेत. राळेगणसिद्धीत नाला बांध, गली प्लगिंग, समतल चर, पाझर तलाव आणि लोकसहभागातून दुष्काळी गावाचा कायापालट झाला. हिवरे बाजारने पाण्याचे बजेट, पिकांचे नियोजन, ठिबक सिंचन, भूजल पुनर्भरण आणि जलसंधारण यांची सांगड घालत जलसुरक्षेचे आदर्श मॉडेल निर्माण केले.

**नागरिकांनी काय करायचे**

शासन आपले काम करीत आहे; परंतु जलसंधारणाची खरी यशोगाथा नागरिकांच्या सहभागाशिवाय पूर्ण होणार नाही. या पावसाळ्यात प्रत्येक नागरिकाने आपल्या घराच्या छतावरील पाणी साठविण्याची किंवा जमिनीत मुरविण्याची व्यवस्था करावी. गावांनी पाण्याचा ताळेबंद तयार करावा. शेतकऱ्यांनी शेततळी, बांधबंदिस्ती, विहीर पुनर्भरण, ठिबक-सिंचन आणि पिकांच्या पाण्याच्या गरजेनुसार नियोजन करावे. गावातील नाले, तलाव, बंधारे आणि पारंपरिक जलस्रोत यांची स्वच्छता व देखभाल करावी. शक्य तेथे श्रमदान करावे. पाणी वाया जाणार नाही, याची प्रत्येक कुटुंबाने काळजी घ्यावी.आणि पावसाळा सुरु आहे. वृक्ष लागवडीत कुटूंबाने दरवर्षी एक या प्रमाणे वृक्ष लागवड करावी.

जलसंधारण हा केवळ मृद व जलसंधारण विभागाचा विषय नाही; तो कृषीचा, ग्रामविकासाचा, पर्यावरणाचा, अर्थव्यवस्थेचा आणि भविष्यातील पिढ्यांचा विषय आहे. कारण पाणी वाचले तर शेती वाचेल, शेती वाचली तर गावाची अर्थव्यवस्था वाचेल आणि गाव समृद्ध झाले तर महाराष्ट्र समृद्ध होईल.

म्हणून २१ ऑगस्टचा जलसंधारण दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा दिवस न राहता प्रत्येकाच्या मनात एक संकल्प निर्माण करणारा दिवस ठरू दे. चला !जलसंधारणातून 'बारमाही हिरवा महाराष्ट्र!' घडवूया!

**प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.क्र.९७०२८५८७७७**

## नशा मुक्ती केंद्र स्थापन करा!

मुंबई : तरुण पिढीला नशेच्या आहारी जाण्यापासून रोखण्यासाठी आणि 'ड्रग्ज फ्री महाराष्ट्र'चे ध्येय गाठण्यासाठी राज्य सरकारने आता कंबर कसली आहे. नशेच्या सेवनानंतर कारवाई करण्यापेक्षा तरुणांना या दुष्टचक्रात ढकलणाऱ्या प्रवृत्तींना मूळापासून नष्ट करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. वर्षा निवासस्थानी पार पडलेल्या 'नशामुक्त महाराष्ट्र धोरण' सादरीकरण बैठकीत त्यांनी राज्यातील प्रत्येक शासकीय रुग्णालयात आणि वैद्यकीय महाविद्यालयात नशा मुक्ती केंद्र स्थापन करण्याची घोषणा केली आहे.

नशामुक्त महाराष्ट्राची निर्मिती करण्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांनी समन्वयाने आणि जबाबदारीने काम करणे गरजेचे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत स्पष्ट केले. गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर आणि गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम यांच्यासह राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर, पोलिस महासंचालक सदानंद दाते, तसेच अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी या उच्चस्तरीय बैठकीस उपस्थित होते. तरुणाईला या विळख्यापासून वाचवण्यासाठी शैक्षणिक संस्थांच्या सुरक्षेवर भर देताना मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयाचा परिसर सक्तीने 'टपरीमुक्त' करण्याचे आदेश दिले आहेत. या नियमात कोणतीही तडजोड चालणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी सर्व शैक्षणिक संस्थांच्या प्राचार्यांनी कॅम्पस अमली पदार्थमुक्त घोषित करण्याबाबतची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. तसेच शालेय अभ्यासक्रमात अमली पदार्थांच्या दुष्परिणामांचा समावेश करण्यावरही भर दिला गेला आहे. एनडीपीएस कायद्यांतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची सुनावणी वेळेत व्हावी आणि खटल्यांचा निपटारा जलदगतीने व्हावा, यासाठी राज्यात जलदगती न्यायालये स्थापन करण्यात येणार आहेत. तसेच केंद्र शासनाच्या धर्तीवर विशेष सरकारी अभियोक्ता पॅनलची स्थापना राज्य शासनाच्या अधिकारांतर्गत करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. जिल्ह्यांची रँकिंग प्रणाली सुरू होणार अमली पदार्थविरोधी कारवायांमध्ये जिल्हास्तरीय समित्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, त्यांच्या कामाचे मूल्यमापन करून जिल्ह्यांची 'रँकिंग प्रणाली' विकसित केली जाणार आहे. तसेच मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय 'एनकॉर्ड' शिखर समितीची स्थापना करण्यात येणार असल्याचेही यावेळी जाहीर करण्यात आले. अमलीपदार्थ विरोधी मोहिमेअंतर्गत २०२५ मध्ये राज्यभरात ५६ हजार २०६ किलो जप्त करण्यात आलेले अमली पदार्थ हे १ हजार ३४० कोटी रुपयांच्या घरात असून, प्रशासकीय यंत्रणेने याविरोधातील लढा अधिक तीव्र करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

## मालाडमधील हॉटेल राधाचा ऋऊ परवाना निलंबित; किचनमध्ये उंदीर, झुरळांचा सुळसुळाट



मुंबई : अस्वच्छतेविरोधात कारवाईचा बडगा उगारत अन्न व औषध प्रशासनाने (ऋऊ) मालाड पश्चिम येथील हॉटेल राधाचा अन्न व्यवसाय परवाना तत्काळ निलंबित केला आहे. १८ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आलेल्या तपासणीत हॉटेलच्या स्वयंपाकघरात गंभीर स्वच्छता आणि अन्नसुरक्षेच्या त्रुटी आढळून आल्या. तपासणीदरम्यान किचनमध्ये जिवंत उंदीर आढळले. उघड्या ड्रेनेजमधून मोठा उंदीर किचनमध्ये येताना आढळला, तर आणखी एक उंदीर छताजवळ दिसून आला. किचनमधील ड्रेनेज लाईन्स उघड्या आणि देखभालीअभावी असल्याचेही आढळले. याशिवाय अन्न तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या उपकरणांवर, त्यात पीठ मळण्याच्या मशीनवरही जिवंत झुरळे आढळून आली. किचनमध्ये पाणी साचलेले होते, मोठ्या प्रमाणात ग्रीस साचला होता आणि खराब ड्रेनेजमधून पाण्याची गळती होत असल्याचे तपासणीत समोर आले. त्यामुळे परिसरात दुर्गंधीचे वातावरण निर्माण झाले होते. या गंभीर त्रुटींची दखल घेत ऋऊ-ने हॉटेल राधाचा अन्न व्यवसाय परवाना तात्काळ निलंबित केला आहे. परवाना क्रमांक ११५१७०१०००००२७ असून, अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ मधील कलम ३२(३) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. १८ ऑगस्टपासून हॉटेलमधील अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, विक्री आणि वितरण यांसह सर्व संबंधित कामकाज तातडीने बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ही कारवाई ऋऊ आयुक्त ख-ड तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार अस्वच्छ आणि अन्नसुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांविरोधातील कठोर धोरणाचा भाग असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## प्रवेशाच्या आमिषाने १.१३ कोटींची फसवणूक; आरोपी महिलेला मुंबईतील विमानतळावर अटक

मुंबई : मुंबई किंवा पुण्यातील वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी एका दुबईस्थित भारतीय उद्योगपती महिलेला तिच्या मुलीला प्रवेश मिळवून देण्याचे आश्वासन देऊन १.१३ कोटी रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली पवई पोलिसांनी एका ३२ वर्षीय पुणेकर महिलेला अटक केली आहे. आरोपी सौम्या करण बोथरा हिला १३ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर अटक करण्यात आली, जेव्हा ती कथितरित्या दुबईला जाण्याचा प्रयत्न करत होती. शोधमोहिमेनंतर इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी तिला ताब्यात घेतले, त्यानंतर पवई पोलिसांनी तिला कोठडीत घेऊन औपचारिकपणे अटक केली. तिचा पती, करण दिलीप बोथारा, याला पोलिसांनी कथित मुख्य आरोपी म्हटले आहे व तो अद्याप फरार आहे. हे प्रकरण २०२२ सालचं आहे. जेव्हा तक्रारदार हेमलता जगदीश जोशी, या दुबईस्थित ४२ वर्षीय भारतीय व्यावसायिक महिला आणि ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया (जउख) कार्डधारक, आपल्या मुलीने १२वी पूर्ण केल्यानंतर तिच्यासाठी एमबीबीएसच्या जागेच्या शोधात होत्या. एफआयआरनुसार, जोशी यांची बोथरा दाम्पत्याशी २०१९ पासून ओळख होती, जेव्हा ते भारत दौऱ्यावर आले होते. कालांतराने दोन्ही कुटुंबांमध्ये घनिष्ठ संबंध निर्माण झाले. पोलिसांनी सांगितले की, करण बोथराने या संबंधाचा कथितपणे गैरफायदा घेतला आणि मुंबई व पुण्यातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आपले प्रभावशाली संपर्क असल्याचा दावा केला. त्याने जोशी यांना त्यांच्या मुलीसाठी ३.२० कोटी रुपयांमध्ये एमबीबीएस प्रवेशाची व्यवस्था करून देण्याचे आश्वासन दिल्याचेही म्हटले जाते. बोथारा दांपत्यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवून, जोशी यांनी आगाऊ रक्कम म्हणून १.१३ कोटी रुपये रोख दिले, असा आरोप आहे. बोथारा यांनी त्यांना सांगितले होते की, प्रवेश निश्चित झाल्यावर उर्वरित रक्कम दिली जाईल. मात्र, वचन दिलेला कबुलीजबाब कधीच मिळाला नाही. वारंवार मागणी करूनही, आरोपीने आगाऊ रक्कम परत केली नाही, असा आरोप आहे. जेव्हा जोशींनी परतफेडीसाठी आग्रह धरला, तेव्हा बोथारा यांनी थकीत रकमेसाठी धनादेश दिले, परंतु खात्यात अपुरे पैसे असल्याने ते धनादेश वटले नाहीत. त्यानंतर जोशी यांनी पवई पोलिसांकडे तक्रार केली की, त्यांची फसवणूक झाली असून, पैसे परत मागितल्यावर त्या जोडप्याने त्यांना धमकीही देण्यास सुरुवात केली होती. पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ४०६ (विश्वासघात), ४२० (फसवणूक), ५०६ (गुन्हेगारी धमकी) आणि ३४ (सामूहिक उद्देश) अंतर्गत एफआयआर नोंदवला. मुंबई सत्र न्यायालयाने २६ जून, २०२५ रोजी या आरोपी दाम्पत्याला तपासात सहकार्य करणे आणि पोलीस ठाण्यात हजर राहणे या अटींसह अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर केला होता. नंतर पोलिसांनी आरोप केला की, त्या दाम्पत्याने या अटींचे पालन केले नाही. दिंडोशी सत्र न्यायालयाने ७ मार्च २०२६ रोजी त्यांचा अटकपूर्व जामिनाचा अर्ज फेटाळला. त्यानंतर या जोडप्याने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली, परंतु १२ जून रोजी त्यांचा अटकपूर्व जामिनाचा अर्जही फेटाळण्यात आला, असे पोलिसांनी सांगितले. दोन्ही आरोपींचा शोध लागल्यानंतर, सौम्या बोथारा यांना १३ ऑगस्ट रोजी मुंबई विमानतळावर इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले. आवश्यक कायदेशीर तरतूदी पूर्ण केल्यानंतर, पवई पोलिसांनी आरोपींना अटक करून अंधेरी येथील ६६ व्या महानगर दंडाधिकारी न्यायालयात हजर केले. आरोपींना सुरुवातीला पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती आणि आता न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तपासात असेही उघड झाले आहे की, सौम्या बोथरा ही मार्केट यार्ड आणि चतुर्शृंगी पोलीस ठाण्यांमध्ये, २०२४ आणि २०२५ मध्ये दाखल झालेल्या फसवणुकीच्या दोन वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये आरोपी आहे. पवई पोलीस आता करण बोथराचा शोध घेत असून, १.१३ कोटी रुपयांच्या कथित व्यवहाराची आणि वापराची चौकशी करत आहेत. या जोडप्याने अशाच प्रकारची आश्वासने देऊन इतर लोकांची फसवणूक केली होती का आणि या योजनेत इतर कोणी सहभागी होते का, आणखी किती लोकांना अश्याच रीतीने गंडा घातला गेला याचाही तपास अधिकारी करत आहेत.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO. MHMAR/rni/reg.no.mahmar/59900/93/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**






जालन्यातील प्रसिद्ध छायाचित्रकार यांचा स्टुडिओ १९४३ पासून म्हणजे स्वातंत्र्यपूर्व विठ्ठल सावजी खानापुरे यांनी सुरू केला होता यानंतर त्यांचा मुलगा पद्माकर विठ्ठलसा खानापुरे यांनी वारसा सांभाळला व त्या पश्चात त्यांची मुलं दत्तात्रय खानापुरे शरद खानापुरे किरण खानापुरे यांची तिसरी पिढी असून अजूनही तो वारसा जतन करून ठेवलेला आहे यासोबत काही दुर्मिळ फोटो बघायला मिळतील त्यावेळी लेविदिन साजरा करण्यात येत होता तो फोटो १९५० चा असून त्यामध्ये विठ्ठल सावजी खानापुरे यांचे नाव मराठवाडा पेपर मध्ये आले होते व काही लेण्यांचे फोटो यासोबत आहेत.

## पुणे ते संभाजीनगर २ तासांत, तर मुंबई-बंगळुरू अवघ्या ५ तासांत!

पुणे : महाराष्ट्रातील रस्ते वाहतूक व्यवस्था अधिक गतीमान करण्यासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी (छळींळप ऋश्रवज्ञरीळ) यांनी अनेक मोठ्या घोषणा केल्या आहेत. पुणे ते छत्रपती संभाजीनगर प्रवास अवघ्या दोन तासांत पूर्ण व्हावा, हे आपले स्वप्न असून त्यासाठी आधुनिक सहापदरी महामार्ग विकसित केला जात असल्याची माहिती त्यांनी दिली. या नवीन महामार्गामुळे पुणे, संभाजीनगर आणि पुढे नागपूरपर्यंतचा प्रवास इतका जलद होईल की नागरिकांना विमानाने प्रवास करण्याची गरज भासणार नाही, असा विश्वास गडकरींनी व्यक्त केला. याशिवाय मुंबई ते बंगळुरू हा प्रवास केवळ पाच तासांत शक्य करणारा रस्ता उभारला जात असल्याचेही त्यांनी सांगितले. पुण्यात आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. पुणे शहर आणि लगतच्या परिसरात वाढलेली वाहतूक कोंडी आणि प्रदूषण ही मोठी चिंता असल्याचे सांगत गडकरी यांनी यावर तातडीने उपाययोजना जाहीर केल्या. येत्या दोन वर्षांत पुणे परिसरासाठी तब्बल ६० हजार कोटी रुपयांच्या रस्ते प्रकल्पांची कामे हाती घेतली जाणार आहेत.

## आयएसआयशी संबंधित पाकिस्तानी नागरिकाच्या तिसऱ्या स्थानिक साथीदाराला बंगाल एसटीएफकडून अटक



कोलकाता : पश्चिम बंगाल पोलिसांच्या विशेष कार्यदलाने (एसटीएफ) पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयशी संबंध असलेल्या पाकिस्तानी नागरिक वहाब आलमच्या तिसऱ्या स्थानिक सहकाऱ्याला अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीची ओळख जफर शम्स उर्फ सनी अशी झाली आहे. आलमला या महिन्याच्या सुरुवातीला उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील हाबरा येथून अटक करण्यात आली होती. पोलिसांच्या माहितीनुसार, पूर्व कोलकात्यातील टॉपसिया येथील रहिवासी असलेला सनी, आलमच्या अटकेनंतर फरार होता. एसटीएफने त्याला हुगळी जिल्ह्यातील रिषडा येथून अटक केली. मात्र, पोलिसांनी त्याच्या अटकेची वेळ आणि कारवाईशी संबंधित इतर माहिती सध्या सार्वजनिक केलेली नाही. एसटीएफचे अधिकारी सनीची चौकशी करून तो आलमच्या कथित कारवायांमध्ये कोणत्या प्रकारे सहभागी होता, याचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहेत. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, तपासकर्त्यांना संशय आहे की, भारतातून गोपनीय माहिती पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयपर्यंत पोहोचवण्यासाठी आलमने तयार केलेल्या गुप्त नेटवर्कला मजबूत करण्यात सनीने भूमिका बजावली असावी. याच्या दोन दिवसांपूर्वी एसटीएफने आलमचा दुसरा सहकारी इमरान हुसेन याला टॉपसिया येथील त्याच्या घरातून अटक केली होती. यापूर्वी आलमचा निकटवर्तीय सहकारी मोहम्मद इजाज यालाही याच परिसरातून अटक करण्यात आली होती. तपासात समोर आले आहे की, आलम कथितरित्या २०१२ मध्ये नेपाळमार्गे बेकायदेशीरपणे पश्चिम बंगालमध्ये दाखल झाला होता. त्यानंतर तो इजाजच्या घरी राहत होता. आरोप आहे की, इजाजने पाकिस्तानी नागरिकासाठी भारतीय ओळखीसंबंधित कागदपत्रे तयार करून घेण्यात त्याला मदत केली होती. एसटीएफला सनीबाबतची माहिती आलम, इजाज आणि इमरान यांच्याकडून स्वतंत्रपणे तसेच नंतर एकत्रितपणे केलेल्या चौकशीदरम्यान मिळाली. या प्रकरणात एसटीएफने १४ ऑगस्टच्या रात्री भारत–बांगलादेश सीमेपासून लागून असलेल्या कूचबिहार जिल्ह्यातील साहेबगंज परिसरातून आणखी तीन संशयित पाकिस्तानी हेरांनाही अटक केली होती. त्यांची ओळख राशिदुल हक, नूर नसीरुद्दीन अली आणि शफीकुल इस्लाम अशी आहे. हे तिघेही भारतीय नागरिक असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए)नेही वहाब आलमबाबत माहिती गोळा करण्यास सुरुवात केली आहे. एसटीएफच्या प्राथमिक तपासात आलमचे आयएसआयशी कथित संबंध समोर आल्यानंतर एनआयएने पश्चिम बंगाल एसटीएफकडून तपास आणि आतापर्यंत गोळा केलेली माहिती मागवली आहे. एनआयए आलम आणि इजाजची चौकशी करणार आहे. गरज पडल्यास इमरान हुसेन तसेच कूचबिहारमधून अटक करण्यात आलेल्या अन्य तीन आरोपींचीही चौकशी केली जाऊ शकते.

## विक्रमी व साहसी सायकलिंग केल्याबद्दल जवाहर काबरा यांचा माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी केला सत्कार !

जालना, प्रतिनिधी, (दि.१६ ) शहरातील जेईएस महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.जवाहर काबरा यांनी वयाच्या ६७ व्या वर्षी सायकलिंग व मोठे साहस करून तरुणांनाही लाजवेल अशा उत्साहात युथ हॉस्टल्स असोसिएशन ऑफ इंडियाद्वारे आयोजित केलेल्या लेह उमलिंगला पास सायकल एक्सपीडिशन मध्ये सहभागी होऊन तब्बल १९०२४ फूट उंचीवर डोंगररांगा सायकल वरून पार करण्याचा विक्रम केला. त्यांच्या या साहसी प्रवासाबद्दल शहराचे माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी त्यांची भेट घेऊन मनः पूर्वक अभिनंदन केले.

प्राचार्य काबरा हे विद्यार्थी दशेतही अत्यंत उत्कृष्ट विद्यार्थी संघटक होते. तसेच सामाजिक उपक्रमातही त्यांचा सहभाग असायचा. त्यांनी रक्तदान करणारा एक मोठा गट उभा केला होता. जेईएस महाविद्यालयात विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून आपली ओळख निर्माण केली. तसेच त्याच महाविद्यालयात पुढे उत्कृष्ट प्राचार्य म्हणून छाप पाडली. आता सेवानिवृत्तीनंतर वयाच्या ६७ व्या वर्षी त्यांनी सायकल वरचा अत्यंत खडतर



प्रवास करून मोठा विक्रम केला आहे. ३६५ किलोमीटरचा दुर्गम प्रवास त्यांनी सायकल वरून पूर्ण केला. लेह पासून सुरू झालेला हा प्रवास शारा, चुमाथांग, न्योमा, होले व चमूमले अशा विविध टप्प्यातून उमलिंगला पास पर्यंत पोहोचला.

त्यांच्या या अतिशय खडतर सहसपूर्ण विक्रमी सायकलिंग बद्दल माजी नगरातील भास्करराव अंबेकर यांनी कौतुक केले. यावेळी माजी शहर प्रमुख बाला परदेशी, नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले, संजय अग्रवाल, दिनेश अग्रवाल, भरत गादीया, विजय शेंदरकर, बबनराव काजळे, जीवन खंडागळे यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

## राज्यात २० ऑगस्टला पाऊस बरसणार; ४ जिल्ह्यांना हवामान खात्याचा यलो अलर्ट

मुंबई : सध्या राज्यात पावसाचा जोर काहीसा कमी असला तरी २० ऑगस्ट रोजी अनेक भागांत पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, कोकणातील काही जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असून, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यातील ४ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. कोकणातील पालघरमध्ये आणि मुंबईत हलका पाऊस, तर ठाणे, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. सिंधुदुर्गातही मध्यम पावसाचा अंदाज असून या सर्व जिल्ह्यांमध्ये अद्याप कोणताही अलर्ट जारी करण्यात आलेला नाही. सोबतच उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक या जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तर नाशिक घाटमाथ्यावर हलका ते मध्यम स्वरूपाच्या पाऊस पडेल असा अंदाज आहे. अहिल्यानगर जिल्ह्यांतही वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. पश्चिम महाराष्ट्रातही पावसाचा वेग काहीसा समानच आहे. पुणे, कोल्हापूर आणि सातारा घाटमाथा परिसरात मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. कोल्हापूर, सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांत हलक्या पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्येही ढगांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. परभणी, बीड आणि नांदेड जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. त्यामुळे यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया,




नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांसाठी २० ऑगस्ट रोजी कोणताही इशारा देण्यात आलेला नाही. मात्र ढगाळ वातावरण निर्माण होऊ शकतं अशी शक्यता आहे. एकंदरच, राज्यात सध्यातरी पावसाचा जोर कमी झाला आहे व कोणत्याही प्रकारचे हाय अलर्ट जारी करण्यात आलेले नाहीत.

पान १ वरून...

### टँकरद्वारे पाणीपुरवठा

जलसंधारणाची कामे अधिक परिणामकारकपणे आणि थेट पद्धतीने पूर्ण करता येतील. मागील पाच वर्षांत ज्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागला, अशा गावांचे विशेष सर्वेक्षण करून त्यांना जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्य द्यावे. या गावांमध्ये स्थानिक भौगोलिक परिस्थिती आणि पाण्याची गरज लक्षात घेऊन जलसंधारणाची कामे निश्चित करावीत. जलस्रोतांच्या बळकटीकरणामुळे निर्माण झालेला सकारात्मक परिणाम नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जलसंधारणाशी संबंधित यशकथा तयार करून त्यांचा प्रभावी प्रसार करावा, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. यावेळी मुख्यमंत्र्यांचे जलविषयक सल्लागार श्रीराम वेदिरे यांनी मृद व जलसंधारण व्यवस्थापनाबाबत सादरीकरण केले. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) विकासचंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन–नैनुटीया, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, रोजगार हमी योजना विभागाचे सचिव अप्पासो धुळाज, आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### आ. अर्जुनराव खोतकर

सेवा नियम २०२६ ला मान्यता) लवकरच विविध पदांची नियमानुसार भरती होऊन महानगरपालिकेचा कारभार सुरळीत होईल व नागरिकांची विकास कामे होण्यास मार्गी लागण्यास मोठी मदत होणार आहे. शासनाने महानगरपालिकेतील विविध पदे भरण्यास प्रत्यक्षात मंजुरी दिल्याने आमदार अर्जुनराव खोतकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, सुनेत्रा पवार यांचे आभार मानले आहे. दरम्यान, जालना शहर आणि ग्रामीण विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ठाम ग्वाही देखील आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिली.

### वैध कत्तलखाना व

मंजुरी जालना महानगरपालिकेच्या प्रशासकीय इतिहासात आजचा दिवस महत्वाचा आहे. महापालिकेचा बहुप्रतिक्षित 'सेवा प्रवेश नियम व सेवांचे वर्गीकरण–२०२६' यास महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने आज, दिनांक १९ ऑगस्ट २०२६ रोजी अधिकृत मंजुरी प्रदान केली आहे. या महत्त्वपूर्ण शासन निर्णयामुळे महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजाला नवी गती आणि ऊर्जितावस्था प्राप्त होणार असून, महापालिकेच्या कार्यरत कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीसह पदभरतीचा मार्ग प्रशस्त झाला आहे. प्रशासकीय बळकटीकरणाची:

जालना महानगरपालिकेचा ९९३ पदांचा आकृतीबंध (आराखडा) शासनाने ११ सप्टेंबर २०२५ रोजी मंजूर केला होता. मात्र, या पदांवर पदोन्नती व थेट पदभरती करण्यासाठी सेवा प्रवेश नियमावलीची नितांत आवश्यकता होती. आज शासनाने नियमावलीवर मंजुरीची दिल्यामुळे महानगरपालिकेचे सर्व विभाग, तसेच प्रभाग कार्यालये आता मनुष्यबळासह पूर्ण क्षमतेने व प्रभावीपणे कार्यान्वित होणार आहेत. यामुळे शहरातील नागरिकांना अधिक गतिमान, पारदर्शक आणि दर्जेदार नागरी सेवा लवकरच उपलब्ध होतील. प्रशासकीय व लोकप्रतिनिधींच्या प्रयत्नांना यश

जालना शहराच्या विकासाचा आणि प्रशासकीय बळकटीकरणाचा ध्यास घेऊन मा. महापौर वंदना अरुण मगरे, मा. उपमहापौर राजेश राऊत, आणि मा.आयुक्त अंजली शर्मा यांनी शासन दरबारी सातत्याने प्रभावी पाठपुरावा केला होता. त्यांच्या या दूरगामी दृष्टिकोनाला आणि अथक प्रयत्नांना अखेर यश आले असून आहे. ठळक वैशिष्ट्ये व पुढील दिशा: पदोन्नतीची सुवर्णसंधी: महापालिकेत वर्षानुवर्षे सेवारत असलेल्या निष्ठावंत कर्मचाऱ्यांना लवकरच पदोन्नतीचा लाभ मिळणार. नव्या पदभरतीस वेग: ९९३ पदांच्या मंजूर आकृतीबंधानुसार रिक्त पदांवर गुणवत्तापूर्ण व पारदर्शक पद्धतीने भरती राबवण्यात येणार. नागरी सुविधांचा कायापालट: सर्व प्रभाग कार्यालयांचे विकेंद्रीकरण होऊन नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निवारण शक्य होणार.

### वाटूर फाटा ते जालना

बाजूचे खड्डे बुजवून रस्ता सुरक्षित होईपर्यंत टोल वसुली बंद करण्याचा निर्णय शासनाने घ्यावा. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांच्याकडे केली आहे.

## ग्रामसभेत गोंधळ, शिवीगाळ अन.; ग्रामसेवकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे येथे एक हृदयद्रावक घटना घडली आहे. ग्रामसभेत झालेला गदारोळ ग्रामसेवकाच्या जीवावर बेतला आहे. ग्रामसभेत काही नागरिकांनी केलेल्या हुल्लडबाजी, शिवीगाळ आणि मारहाणीच्या प्रयत्नामुळे आलेल्या तीव्र मानसिक तणावातून ग्रामसेवक प्रल्हाद पाटील (वय ५४, रा. ओम नगर, पारोळा) यांना हृदयविकाराचा झटका येऊन त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी रात्री उशिरा ६ जणांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कामांच्या जुन्या बिलावरून वाद

मिळालेल्या माहितीनुसार, शिवरे गावात १६ ऑगस्ट रोजी ग्रामसभेचं आयोजन करण्यात आलं होतं. या सभेला गावातील तरुण मंडळींसह सरपंच, पोलीस पाटील व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. सभा सुरू असताना जुन्या कामांच्या बिलावरून ग्रामस्थ आणि ग्रामसेवक प्रल्हाद पाटील यांच्यात शाब्दिक चकमक उडाली. तर काही तरुणांनी पाटील यांना जाब विचारत अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली व त्यांना मारहाण करण्याचा प्रयत्न केला. या वादातून प्रचंड मानसिक धक्का बसल्यानं अस्वस्थ वाटू लागल्यामुळे ग्रामसेवक पाटील हे सभेतून निघून आपल्या घरी गेले. तब्बेत खालावल्याने त्यांना तत्काळ पारोळा येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, प्रकृती अधिक चिंताजनक झाल्यानं पुढील उपचारासाठी दुसऱ्या दवाखान्यात नेलं जात असतानाच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि त्यांची प्राणज्योत मालवली. ही घटना सोमवारी दुपारी २ वाजेच्या सुमारास घडली. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे. ग्रामसेवक पी. एन. पाटील यांच्या मृत्यूची बातमी पसरताच सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट पसरली आहे. पारोळा, जळगाव, अमळनेर, भडगाव आणि पाचोरा येथील ग्रामसेवक संघटनेच्या अधिकाऱ्यांनी पारोळा पोलीस ठाण्यात (झरीश्रर झेश्रळलश डींरींळेप) धाव घेत ठिय्या आंदोलन केले. मोबाईल व्हिडिओ आणि सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून दोषींवर तत्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणी यावेळी करण्यात आली आहे. १७ ऑगस्ट रोजी झालेल्या ग्रामसभेमध्ये ग्रामसेवक त्यांच्याशी वाद करणारा संशयित आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर घटनेची माहिती मिळताच पारोळा पोलीस ठाण्याने तातडीने कारवाई करत संबंधित सात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०५ (सदोष मनुष्यवध) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.


## राज्याच्या खोल समुद्रात होणार 'मसल फार्मिंग'

मुंबई : समुद्रातील मत्स्यव्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत खोल समुद्रात मसल फार्मिंग तसेच केजिंगच्या (जाळे) माध्यमातून कोबिया प्रजातीच्या माशांचे संवर्धन करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रायोगिक तत्वावर सुरू करावा. मात्र स्थानिक मच्छिमारांचा गैरसमज होवू नये, यासाठी त्यांना विश्वासात घेण्याचे निर्देश मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी बुधावरी दिले. मंत्रालयात मदर ओसियन कंपनीच्या वतीने प्रकल्पाचे सादरीकरण कंपनीचे संचालक मितेश शहा यांनी केले. यावेळी महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी., मत्स्य आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, जि.प.चे मुख्य कार्यकारी रवींद्र खेबुडकर, कंपनीचे संचालक मितेश शहा, बियॉन्ड एस्पॉय आणि प्रेमदीप व्होरा, तपन सामंत आदी उपस्थित होते. मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, खोल समुद्रातील मत्स्यसंवर्धनाच्या माध्यमातून मत्स्य उत्पादन वाढविणे, आधुनिक मत्स्यपालन तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणे तसेच मत्स्य व्यवसायातील रोजगार व गुंतवणुकीच्या नव्या संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने या प्रकल्पाला महत्त्व आहे. स्थानिक मच्छिमारांचा गैरसमज दूर करून प्रकल्प राबवावा. या प्रकल्पांतर्गत खोल समुद्रात सुमारे ६० मीटर आकाराचे जाळे उभारून त्यामध्ये कोबिया प्रजातीच्या माशांचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन करण्यात येणार आहे. तसेच खोल समुद्रात मसल अर्थात कालवे पालन करण्याच्या प्रकल्पाचाही यामध्ये समावेश आहे. प्रकल्पासाठी मदर ओसियन कंपनीच्या नॉर्वे येथील कंपनीसोबत संयुक्त उपक्रम असून, या भागीदारीच्या माध्यमातून आधुनिक आणि आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे प्रस्तावित आहे.

# किसान मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर माऊली शेजूळ; अंकुशराव बोबडे यांची पुनर्नियुक्ती, राजेश मोरे प्रदेश सदस्यपदी नियुक्ती

जालना : भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा, महाराष्ट्र राज्याच्या प्रदेश उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर माऊली शेजूळ यांची नियुक्ती करण्यात आली असून, प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी अंकुशराव बोबडे यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच राजेश मोरे यांची महाराष्ट्र प्रदेश सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपच्या संघटनात्मक विस्ताराच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेल्या या नियुक्त्यांमुळे पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्ञानेश्वर माऊली शेजूळ, अंकुशराव बोबडे आणि राजेश मोरे हे पक्षाच्या संघटनात्मक कार्यात सक्रिय असून, शेतकरी व सर्वसामान्यांच्या विविध प्रश्नांसाठी काम करण्याची भूमिका त्यांनी यापूर्वीही मांडली आहे. ज्ञानेश्वर माऊली शेजूळ, अंकुशराव बोबडे आणि राजेश मोरे हे भाजप नेते तथा माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचे कट्टर समर्थक म्हणून परिचित आहेत. पक्ष संघटना मजबूत करण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या प्रश्नांना शासनदरबारी प्रभावीपणे





मांडण्याच्या दृष्टीने त्यांच्या नव्या जबाबदाऱ्या महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. कृषी क्षेत्रातील अडचणी, शेतमालाला योग्य भाव, पीकविमा, सिंचन, शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे तसेच ग्रामीण भागात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे या विषयांवर आगामी काळात अधिक प्रभावीपणे काम करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, राजेश मोरे यांच्या महाराष्ट्र प्रदेश सदस्यपदी झालेल्या नियुक्तीचेही भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थकांकडून स्वागत करण्यात येत आहे. नव्या जबाबदाऱ्यांच्या माध्यमातून पक्षाची विचारधारा आणि संघटनात्मक कार्य तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी तिन्ही पदाधिकाऱ्यांकडून प्रभावी काम केले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या नियुक्त्यांबद्दल भाजपा कार्यकर्त्यांकडून ज्ञानेश्वर माऊली शेजूळ, अंकुशराव बोबडे आणि राजेश मोरे यांचे अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# माजी आ.कैलास गोरंटयाल यांचा पाठपुरावा जालना मनपातील पदभरतीचा मार्ग मोकळा

९९३ पदांच्या सेवाप्रवेश नियमावलीस राज्य शासनाची मान्यता

जालन/प्रतिनीधी : जालना शहर महानगर पालिकेच्या आकृतीबंधातील मंजुर ९९३ पदांच्या सेवाप्रवेश नियमावलीस राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने मान्यता दिली असून या निर्णयामुळे जालना मनपात पदभरतीचा मार्ग मोकळा झाला असल्याची माहिती भाजपा नेते तथा माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी दिली आहे.

जालना शहर महानगर पालिका दि.२२ ऑगस्ट २०२३ रोजीच्या अधिसूचनेन्वये नव्याने गठीत करण्यात आली असून दि.११ सप्टेंबर २०२५ रोजी एका शासन निर्णयान्वये ९९३ पदांसाठी आकृतीबंध मंजुर करण्यात आला आहे. महानगर पालिका अस्तित्वात आल्यानंतर कार्यरत कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून कामकाजाचा गाडा हाकावा लागत होता. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढत असल्याने भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर,भाजपा जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, आ.संतोष दानवे आणि आपण स्वतः राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे जालना मनपातील कर्मचारी भरती संदर्भात



सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याने दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नगर विकास खात्याच्या अधिकाऱ्यांना आकृती बंधातील मंजुर ९९३ पदांच्या सेवानियमावलीस मान्यता देण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार नगर विकास विभागाने मान्यता प्रदान केली असून या निर्णयामुळे जालना मनपातील कर्मचारी भरतीचा मार्ग मोकळा झाला असल्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी सांगितले.

## पद भरतीची प्रक्रिया लवकरच करणार

**जालना शहर महानगर पालिकेत सध्या विविध संवर्गातील जवळपास ४७५ कर्मचारी कार्यरत आहेत. कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता आणि शैक्षणिक पात्रता पडताळून पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रथम पदोन्नती देण्याची प्रक्रिया जालना मनपातर्फे राबविण्यात येणार असून त्यानंतर लिपिक, कनिष्ठ अभियंता, वर्ग -४ यासह अन्य संवर्गातील कर्मचाऱ्यांची पदे सरळ सेवेद्वारे भरली जाणार असल्याचे माजी आमदार तथा भाजपा नेते कैलास गोरंटयाल यांनी सांगितले.**

# लोकसभेच्या सेमीफायनलची सुत्रं तावडेंकडे; पुढल्याच वर्षी अग्निपरीक्षा; दुर्मिळ हॅट्रिकचं आव्हान

लखनऊ: भारतीय जनता पक्षाच्या संघटनेत विनोद तावडे यांना पुन्हा एकदा महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. बिहारची विधानसभा निवडणूक भाजपसह एनडीएला मोठ्या फरकानं जिंकून देणाऱ्या तावडे यांच्याकडे भाजपनं मोठी जबाबदारी दिली आहे. तावडे यांच्याकडे उत्तर प्रदेश उत्तर प्रदेशच्या संघटनेची जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे. पुढील वर्षी उत्तर प्रदेशात विधानसभेची निवडणूक आहे. भाजपसाठी ही निवडणूक अतिशय महत्त्वाची आणि प्रतिष्ठेची आहे. सुनील बन्सल यांना उत्तर प्रदेशच्या संघटन महामंत्री पदावरून दूर करण्यात आल्यानंतर प्रदेश संघटनेची जबाबदारी गेल्या काही वर्षांत कोणत्याही बड्या नेत्याला देण्यात आलेली नव्हती. उत्तर प्रदेश भाजप ला एका कुशल संघटकाची गरज होती. राधा मोहन सिंह यांच्यानंतर उत्तर प्रदेश भाजप प्रभारी पद रिक्त होतं. गेल्या काही दिवसांपासून विनोद तावडे अनौपचारिकपणे उत्तर प्रदेशात समन्वयाचं काम पाहात होते. मंत्रिमंडळ विस्तारातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. बिहारमध्ये भाजप प्रणित एनडीएनं गेल्याच वर्षी दणदणीत विजय मिळवला. त्या निवडणुकीची सुत्रं भाजपनं तावडे यांच्याकडेच दिली होती. भाजपच्या विजयात आणि सम्राट चौधरी यांना मुख्यमंत्री करण्यात तावडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. बिहारमध्ये संघटनात्मक पातळीवर तावडेंनी केलेल्या कामाचं कौतुक झालं होतं. गेल्या अनेक वर्षांपासून विनोद तावडे संघटनेत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडत आहेत.

# किड्स किड्स केंब्रिज स्कूल, येथे जालना येथील व्यसन मुक्ती जनजागृत

जालना/प्रतिनिधी : आज दिनांक १९ ऑगस्ट रोजी किड्स केंब्रिज स्कूल, येथे जालना येथील व्यसन मुक्ती जनजागृती करण्यासाठी महिला स्व संरक्षण मार्गदर्शन करण्यासाठी दामिनी पथक ची टीम पूनम भट्ट, सिंधु खरजूले,जयश्री म्हस्के, श्रद्धा गायकवाड, चित्रा चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल वर अनोळखी नंबर वरून पैसे कॉल आला असता आपण कशा प्रकारे सतर्क राहावे, गैरवर्तनाबद्दल आपण लोकांपासून दूर रहावे, मोबाईलचा अती वापर करू




नये, व्यसनाच्या आधीन जाऊ नये, महिलांच्या बाबतीत गैरवर्तन करू नये, मुलींनाही स्व संरक्षण कसे करावे याचे विडिओ च्या माध्यमातून मार्गदर्शन केले आपले उज्वल भविष्य शिक्षणाच्या माध्यमातून कसे घडवून आणावे. व वेळेप्रसंगी मदतीची काहीही गरज पडली तर दामिनी पथक आपल्या मदतीला दहा मिनिटाच्या आत हजर राहील. असे आश्वासन यावेळी करण्यात आले. या मार्गदर्शन प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका अलका गव्हाणे ,कविता नरवडे, शबनम सिद्दीकी, मनीषा देशमुख यांनी सर्व टीमचे स्वागत केले.

# सशस्त्र दलात अधिकारी होण्याची सुवर्णसंधी; नाशिक येथे मोफत पूर्व प्रशिक्षण

जालना/प्रतिनिधी : भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होऊ इच्छिणाऱ्या पात्र उमेदवारांसाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने मोफत पूर्व प्रशिक्षणाची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (ड्ड्इ) परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्यासाठी हे प्रशिक्षण नाशिक रोड येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रात आयोजित करण्यात आले आहे.



महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतींसाठी आयोजित करण्यात येणारे हे प्रशिक्षण २१ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत होणार आहे. निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींनी २० सप्टेंबर २०२६ रोजी नाशिक रोड, नाशिक येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रात उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षणासोबत निवास व भोजनाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

जालना जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्यदलातील अधिकारी पदाची संधी मिळविण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत मुलाखतीसाठी हजर राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मुलाखतीस येताना उमेदवारांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या संकेतस्थळावरून ड्ड्इ परीक्षेसाठी असलेले कॉल लेटर डाउनलोड करून त्याची प्रिंट सोबत आणावी. संबंधित कागदपत्रांची पूर्तता करूनच मुलाखतीस उपस्थित राहणे आवश्यक आहे.

ड्ड्इ वर्गामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी उमेदवाराकडे खालीलपैकी कोणतीही एक पात्रता असणे आवश्यक आहे– CDSE-UPSC qH$dm ND--UPSC परीक्षा उत्तीर्ण झालेली असावी आणि त्यासाठी सर्व्हिस सिलेक्शन बोर्डच्या मुलाखतीस पात्र ठरलेले असावे.

NCC Special Entry gmR>r SSB मुलाखतीचे कॉल लेटर असावे.

Technical Graduate Course साठी SSB मुलाखतीचे कॉल लेटर असावे.

University Entry Scheme gmR>r SSB कॉल लेटर असावे किंवा ड्ड्इसाठी शिफारस केलेल्या यादीत उमेदवाराचे नाव असावे.

या पात्रतेपैकी कोणतीही एक अट पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना संबंधित प्रशिक्षणाचा लाभ घेता येणार आहे. प्रशिक्षणासंदर्भातील अधिक माहितीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथील प्रभारी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेत ीरळपळपस. लिींलपरीहळझ्रसारळश्र.लो या ई–मेलवर तसेच दूरध्वनी क्र. ०२५३–२४५७९०२ किंवा ९१५६०७३३०६ या क्रमांकांवर संपर्क साधवा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जालना (अतिरिक्त कार्यभार) यांनी केले आहे.

कार्यालय, नगर परिषद परतूर
जा.क्र. 1099/2026
दिनांक :– 19/08/2026

## निविदा सुचना क्र. 12 (सन 2026-27)

सन 2026-27 या वित्तीय वर्षा करीता नगर परिषदेस आवश्यक आलेले खालील विविध साहित्य खरेदी / पुरवठा करणे करोता स्वतंत्र निविदा (दरपत्रक) दिनांक 27/08/2026 रोजी दुपारी 4.00 वाजे पर्यंत मुख्याधिकारी नगर परिषद परतूर हे मागवित आहे. बंद लिफाफा दरपत्रके नगर परिषद परतूर या कार्यालयात स्विकारण्यात येतील. प्रत्येक बाबीचा अनामत रक्कम, नियम व अटी (कोरे) निविदा दरपत्रक बाबतचा तपशिल नगर परिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळून पहावयास मिळतील.

| अ.क्र. | विवरण | कोरे निविदा दरपत्रक अर्जाची किंमत |
|---|---|---|
| अ. | **पाणी पुरवठा विभाग** | |
| | 1. ब्लॉचिंग पावडर पुरवठा करणे (जलशुध्दीकरण केंद्र) | 2000.00 |
| | 2.आलम (तुरटी) पुरवठा करणे (जलशुध्दीकरण केंद्र) | 2000.00 |
| | 3. हातपंप व मोटार दुरूस्ती करणे | 5000.00 |
| | 4. हातपंप व मोटार साहित्य पुरवठा करणे | 2000.00 |
| | 5. पाणीपुरवठा विभागास लागणारे साहित्य खरेदी करणे. | 2000.00 |
| ब. | **आरोग्य विभाग** | |
| | 1. हंगामी मजूर पुरवठा करणे. | 2000.00 |
| | 2. आरोग्य विभागा अंतर्गतची वाहने देखभाल व दुरूस्ती करणे. | 500.00 |
| | 3. स्वच्छता विभागा करीता लागणरी आवश्यक वाहने भाडे तत्वावर घेणे, | 2000.00 |
| | 4. स्वच्छता विभागास लागणारे आवश्यक साहित्य पुरवठा करणे | 2000.00 |
| क. | **सार्वजनिक बांधकाम विभाग** | |
| | 1.बांधकाम विभागा करीता तांत्रिक सल्लागार(PMC) यांची पॅनलवर नियुक्ती करणे बाबत. | 500.00 |
| | 2. किरकोळ रस्ते व इमारत दुरूस्त करणे बाबत. | 2000.00 |
| | 3कार्यालय अंतर्गत लागणारे फर्निचर पुरवठा व दुरूस्ती करणे बाबत. | 500.00 |
| ड. | **आस्थापण विभाग** | |
| | 1. न.प.परतूर कार्यालयास आवश्यकतेनुसार पोष्टर्स/बॅनर्स तयार करून देणे बाबत. | 500.00 |
| | 2. न.प. परतूर कार्यालयास आवश्यकतेनुसार लागणारे कापड पुरवठा करणे बाबत. | 1000.00 |
| | **महिला व बालकल्याण विभाग** | |
| | 1. न.पा. आयोजित विविध कार्यक्रमाचे व्हिडीओ शुटीग करणे व फोटो काढणे, | 500.00 |
| | 2. न.प. तर्फे आयोजित विविध कार्यक्रमाच्या ठिकाणी टेंट व अनुषंगीक सर्व साहित्य भाडे | 500.00 |
| | 3. न.पा. कार्यालयीन उपयोगासाठी आवश्यकतेनुसार फर्निचर साहित्य पुरवठा करणे | 500.00 |
| | 4. दिव्यांग व आवश्यकतेनुसार इतर कार्यक्रम घेणे | 500.00 |
| इ | **संगणक विभाग** | |
| | 1.संगणक विभागात आवश्यकतेनुसार (संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, स्कॅनर) सर्व साहित्य पुरवठा करणे व देखभाल दुरूस्ती (संगणक, प्रिंटर, रिफीलींग) रिपेरिंग करणे. | 1000.00 |
| | 2. न.प. कार्यालयास आवश्यकतेनुसार सी. सी. टीव्ही कॅमेरे पुरवठा करून सेट अप करणे व देखभाल दुरूस्ती करणे. | 1000.00 |
| ई | **विद्युत विभाग** | |
| | 1. विद्युत विभागा करीता आवश्यकतेनुसार लागणारे साहित्य पुरवठा करणे बाबत. | 1000.00 |
| | 2. विद्युत विभागा अंतर्गत विद्युत उपकरणे दुरूस्त करणे | 500.00 |
| उ | **अग्निशमन विभाग** | |
| | 1. अग्निशमन कार्यालयातील वाहने देखभाल व दुरूस्ती करणे. | 500.00 |
| | 2. अग्निशन विभागास आवश्यकतेनुसार लागणारे साहित्य पुरवठा करणे. | 1000.00 |

**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे :-**
**नियम व अटी :-**

1. कोरे निविदा दरपत्रक रोख किंतीने नगर परिषद कार्यालयात वेळेत दिनांक 21/08/2026 पासून ते दिनांक 27/08/2026 पर्यंत मिळतील. (सुटीचे दिवस वगळून)
1. निविदा दरपत्रकासोबत अनामत रक्कम रोख स्वरूपात भरणा करून पावती दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.
2. दरपत्रका सांवत दुकानाचे लायसन / विक्री कर व अनुषंगीक इतर प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
3. लिफाफा बंद निविदा (दरपत्रक) मुख्याधिकारी यांचे कार्यालयात दिनांक 27/08/2026 रोजी दु. 4– वाजे पर्यंत स्विकारले जातील व शक्य असल्यास त्याच दिवशी निविदा दरपत्रके उघडल्या जातील.
4. पुरवठा केलेल्या साहित्याच्या बीलातून शासकीय नियमानुसार रक्कम कपात करण्यात येईल व कपात केलेली रक्कम अंतिम बीला सोबत देण्यात येईल.
5. अटी किंवा शर्ती असलेली निविदा दरपत्रक स्विकारले जाणार नाहीत,
6. कोणतेही किंवा सर्व निविदा दरपत्रक कारण न दर्शविता अमान्य करणे किंवा रद्द करण्याचे अधिकार नगर परिषदेनं राखून ठेवला आहे.
7. सदर बाबतचा कालावधी कार्यारंभ आदेशापासून एक (01) वर्षासाठी राहिल.

**स्वा/-**
**मुख्याधिकारी**
नगर परिषद परतूर

**अध्यक्ष**
नगर परिषद परतूर